|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- ३ ऑक्टोबर, २०२३

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) आभासी जगातील वावर वाढल्यामुळे लोक काल्पनिक जगात वावरू लागले आहेत आणि त्यांच्यातील संवाद आणि संवेदना हारपल्या आहेत असे प्रतिपादन नामवंत बालरोग तज्ज्ञ डॉ. अभिनय दरवडे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने “खान्देश कन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी” ऑनलाईन व्याख्यानमालेत डॉ. दरवडे बोलत होते. विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांची यावेळी उपस्थिती होती. डॉ. दरवडे म्हणाले की, बस, रेल्वे किंवा विमान प्रवासात ही शेजारी बसलेल्या व्यक्तीशी संवाद साधला जात नाही. मोबाईल काढून हेडफोन कानाला लावला अथवा लॅपटॉप काढून बसले की, त्या व्यक्तीचा प्रवास सुरू होतो. मोबाईल आणि सोशल मिडीयामुळे जीवन जगण्याच्या त-हा बदलत चालल्या आहेत. नात्यातील संवाद दुरावला आहे. सगळे जण आभासी जगात व्यस्त आहेत असे ते म्हणाले. व्यक्तीने आभासी जगात न वावरता वाट्याला आलेले आयुष्य समरसून जगायला हवे. एकमेकांच्या सुख दु:खात सहभागी व्हावे असे ते म्हणाले. यावेळी पाहुण्यांचा परिचय वर्षा परदेशी हीने करून दिला. सुत्रसंचालन उत्कर्षा पाटील हीने केले तर ऐश्वर्या मोरे हीने आभार मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. ३ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळे अंतर्गत महात्मा गांधी अध्ययन व संशोधन केंद्रामार्फत गांधी सप्ताहातील दुसऱ्या दिवशी “व्यसनमुक्ती पथनाट्य” व “गती घटाये जीवन बढाये” याविषयावरील व्याख्यानाचा कार्यक्रम संपन्न झाला.

दि. २ ते ६ ऑक्टोबर या दरम्यान गांधी सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्याअंतर्गत मंगळवार दि. ३ ऑक्टोबर रोजी विनोद ढगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी व्यसनमुक्ती पथनाटय विद्यापीठात सादर केले. त्यानंतर जेष्ठ सर्वोदयी डॉ.सुगन बरंठ यांनी गती घटाये जीवन बढाये या विषयावर व्याख्यान दिले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे अध्यक्षस्थानी होते. डॉ.बरंठ यांनी सांगितले की, भौतिक जगातील वाढत असलेल्या चुकीच्या जीवन पध्दतींवर आळा घालून पारंपरिक पध्दतीचा वापर करावा. भौतिक जगाच्या हव्यासापोटी असलेली आपल्या जीवनातील गती कमी करुन उत्तम दर्जाचे जीवन व्यतीत केले पाहिजे. या व्याख्यानात त्यांनी अनेक उदाहरणे दिली. व्याख्यानानंतर प्रश्नोत्तरे झाली. प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ.उमेश गोगडीया यांनी केले तर आभार प्रभारी संचालक डॉ.म.सु.पगारे यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ.विजय घोरपडे यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी प्रशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वास

जनसंपर्क अधिकारी